लक्षवेधी

डॉ. जॅस्मिन यांच्या प्रमुख उपस्थितीत सायबर शिक्षित गाव प्रमाणपत्र प्रदान

अर्जुनी गाव ठरले महाराष्ट्रातील पहिले सायबर शिक्षित गाव

त. भा. प्रतिनिधी

सेनापती कापशी : कागल तालुक्यातील अर्जुनी गावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, या गावाची महाराष्ट्रातील पहिले सायबर शिक्षित गाव म्हणून घोषणा करण्यात आली. यानिमित्त क्विक हेल्प फाउंडेशन पुणे, देवचंद कॉलेज अर्जुननगर यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' उपक्रमांतर्गत सायबर शिक्षित गाव प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



अर्जुनी : सायबर शिक्षित गाव म्हणून प्रमाणपत्र देताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन इतर मान्यवर.

कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायत अर्जुनीला सायबर शिक्षित गावाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. गावामध्ये नागरिक, विद्यार्थी, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांमध्ये सायबर सुरक्षा, सुरक्षित ऑनलाइन व्यवहार, ओटीपी, यूपीआय, पिन, फिशिंग लिंक, बनावट कॉल व ऑनलाइन फसवणूक याबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमात देवचंद कॉलेज येथील सायबर वॉरियर्स क्लब ची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. क्विक हेल फाउंडेशन यांच्या सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा या उपक्रमाच्या सहकार्याने विविध जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रमास क्विक हेल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, कागल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कुलदीप बोंगे, असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के, पोलीस उपनिरीक्षक अनिकेत कुडले, प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ आर. एम. साठुखे, उपप्राचार्य डॉ. ए. एस. डोनर, प्रशासक ग्रामपंचायत अर्जुनी जे. एन सातवेकर, ग्रामविकास अधिकारी प्रवीणसिंह सुळकुडे तसेच ग्रामस्थ शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या संकल्पनेच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये प्रा. प्रशांत सुभाष कुंभार, देवचंदचे प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. सुरक्षित नागरिक सुरक्षित डिजिटल व्यवहार सायबर शिक्षित अर्जुनी' हा संदेश देत कार्यक्रमाची सांगत झाली. ग्रामपंचायत अर्जुनीच्या य उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले.